जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

दै. पुढारी
बुधवार, दिनांक 17 FEB 2016



**कोल्हापूर :** अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ. यू. म. पठाण यांनी सोमवारी शिवाजी विद्यापीठाला भेट देऊन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्याशी चर्चा केली. डॉ. शिंदे यांनी डॉ. पठाण यांचा शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार केला. यावेळी डॉ. यू. म. पठाण यांची मुलगी 'नाज', प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. डी. व्ही. मुळे, डॉ. आर. एन. ठाकूर, डॉ. नंदकुमार मोरे आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

दै. सकाळ बुधवार दिनांक 17 FEB 2016

# मंगळवारपासून 'ऊर्जा- संवाद'

## चला, शिवाजी विद्यापीठात : भांडारकर, जोशी यांच्यासह नऊ शिलेदार

संवाद ध्येयवेड्यांशी ऊर्जा


मधुर भांडारकर


अचला जोशी


राजेंद्र पटेल


यशवंतराव थोरात


सुभाष अवचट


प्रदीप लोखंडे


विश्वास नांगरे-पाटील


रेखा चौधरी


अभिनय देव

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १६ : अनंत अडचणींवर मात करून यशोलौकिकाचे शिलेदार ठरलेल्या जगप्रसिद्ध व्यक्तिमत्त्वांशी संवाद साधण्याची पर्वणी यंदाही २३ फेब्रुवारीपासून कोल्हापूरकरांना लाभणार आहे. सकाळ माध्यम समूह आणि शिवाजी विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने सलग सात दिवस वेदार्जुन इन्फ्रास्ट्रक्चर प्रायव्हेट लिमिटेड प्रस्तुत 'ऊर्जा - संवाद ध्येयवेड्यांशी' हा अनोखा कार्यक्रम रंगणार आहे. मार्व्हलस इंजिनिअर्स प्रायव्हेट लिमिटेड, सीएमएम अरेना मेगा स्टोअर, नेक्सा- कोल्हापूर सेंट्रल सहप्रायोजक असून हॉटेल सयाजी हॉस्पिटॅलिटी पार्टनर आहे.

दरम्यान, आपल्या आजवरच्या वाटचालीतील विविध अनुभवांची शिदोरी ते या निमित्ताने सर्वांसमोर रिती करतीलच; त्याशिवाय प्रत्येकातील नवचेतना जागवताना आपापल्या क्षेत्रात नेटाने पुढे जाण्यासाठीची ऊर्जाही देतील. शिवाजी विद्यापीठात २९ फेब्रुवारीपर्यंत दररोज सायंकाळी सहा ते रात्री आठ या वेळेत हा संवाद होईल. कार्यक्रमाला सर्वांसाठी विनामूल्य खुला प्रवेश असेल.

'सकाळ'ने गेल्या वर्षीपासून या अनोख्या उपक्रमाला प्रारंभ केला. गेल्या वर्षी बॉलिवूडचे प्रसिद्ध निर्माता, दिग्दर्शक आणि पटकथाकार सुभाष घई, प्रसिद्ध अभिनेता अतुल कुलकर्णी, भारत विकास ग्रुप-बीव्हीजी इंडिया लिमिटेडचे हणमंतराव गायकवाड, साधा हॉटेलवाला ते जगभरात हॉटेलची साखळी निर्माण करणारे विठ्ठल कामत, 'डिजिटल डिक्शनरीकार' म्हणून जगभरात ओळख असलेले सुनील खांडबहाले, 'सुपर थर्टी'चे संस्थापक आणि गणितज्ज्ञ आनंद कुमार, न्यूयॉर्कमधील भारताचे कॉन्सुलेट जनरल ज्ञानेश्वर मुळे यांच्याशी दिलखुलास संवाद साधण्याची संधी मिळाली होती.

यंदाही अशाच नामांकित वक्त्यांची प्रभावळ लाभली असून पहिल्या दिवशी प्रसिद्ध दिग्दर्शक मधुर भांडारकर पहिले पुष्प गुंफतील. २४ फेब्रुवारीला भारतातील पहिली वाईन उद्योजिका अचला जोशी, प्रसिद्ध उद्योजक राजेंद्र पटेल, २५ फेब्रुवारीला नाबार्डचे माजी अध्यक्ष यशवंतराव थोरात, २६ फेब्रुवारीला जागतिक कीर्तीचे चित्रकार सुभाष अवचट, २७ फेब्रुवारीला कुशल संघटक प्रदीप लोखंडे, २८ फेब्रुवारीला औरंगाबादचे विशेष पोलिस महानिरीक्षक विश्वास नांगरे-पाटील, २९ फेब्रुवारीला ग्लोबल वेलनेस ॲम्बॅसिडर रेखा चौधरी, दिग्दर्शक अभिनय देव यांच्याशी संवाद साधता येणार आहे. चला तर मग, आजच वेळेचे नियोजन करू या. २३ ते २९ फेब्रुवारीची सायंकाळ नवप्रेरणादायी करू या...!

### विनामूल्य प्रवेश

**शिवाजी विद्यापीठाच्या लोककला केंद्रात २९ फेब्रुवारीपर्यंत दररोज सायंकाळी सहा ते रात्री आठ या वेळेत हा उपक्रम होईल. कार्यक्रमाला सर्वांसाठी विनामूल्य खुला प्रवेश असून प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य असेल. कार्यक्रमाला होणाऱ्या गर्दीच्या पार्श्वभूमीवर पार्किंगची नेटकी व्यवस्था केली जाणार आहे.**

### स्वत:ला घडविण्याची संधी

**ऊर्जा कार्यक्रमातून देशभरातील नामांकित व्यक्तींशी संवाद साधता येणार आहे. आपापल्या क्षेत्रात त्यांनी कसे यश मिळविले, आलेल्या अडचणींवर कशी मात केली, अशा विविध अंगांनी त्यांच्याकडून मौलिक मंत्र मिळणार आहे. त्यामुळे महाविद्यालयीन विद्यार्थ्यांपासून ते सर्वच घटकांना 'स्वत:ला घडविण्या'ची ही एक कार्यशाळा ठरणार आहे.**

दै. तरुण भारत बुधवार, दिनांक 17 FEB 2016

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# दीक्षांत सोहळ्याची तयारी युद्धपातळीवर

## आयटीसीचे कुलगुरू प्रो. जी. डी. यादव समारंभाचे प्रमुख पाहुणे, विद्यापीठाचा दीक्षांत समारंभ २७ फेब्रुवारीला

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाचा दीक्षांत समारंभ २७ फेब्रुवारी रोजी होणार आहे. विद्यापीठ प्रशासनाकडून या सोहळ्याची समारंभाची तयारी युध्द पातळीवर सुरू आहे. कोल्हापूरचे सुपुत्र आणि मुंबई येथील आयसीटीचे कुलगुरू पद्मश्री प्रो. डॉ. जी. डी. यादव यांना दीक्षांत समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून निमंत्रित केले आहे.

दीक्षांत समारंभाच्या नियोजनासाठी आस्थापना मार्फत २७ समित्या गठीत केल्या आहेत. या समित्यांमधून एकूण ४३० कर्मचारी कार्यरत आहेत. लेखाविभाग व अस्थापनाकडूनच्या परवानगीने कर्मचारी काम करीत आहेत. कुलगुरू अधिकार मंडळ, पाहुणे, विद्यार्थी यांच्यासाठीच्या गाऊनची स्वच्छता आणि नवीन खरेदीही केली



प्रो. डॉ. जी. डी. यादव

जात आहे. प्रत्येक समितीला वेगवेगळया कामाची जबाबदारी दिली आहे. पदवी प्रमाणपत्र छापण्याचे कामही युध्द पातळीवर सुरू आहे. यावर्षी सर्वसाधारण ५० हजार पदव्या प्रदान केल्या जाणार आहेत. लोककला केंद्रात डेकोरेशन कसे करायचे, सकाळच्या ग्रंथ दिंडीपासून ते प्रमुख कार्यक्रमापर्यंतच्या नियोजनाचा आराखडा जवळपास तयार झाला आहे.

शिवाजी विद्यापीठातर्फे यावर्षी ५० हजार विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्रे प्रदान करण्यात येणार आहेत. यापैकी २५ हजार विद्यार्थी व विद्यार्थीनी प्रत्यक्ष पदवी घेणार आहेत. शिवाय २५ हजार विद्यार्थ्यांना पोस्टाने घरपोच पदवी प्रमाणपत्रे



पाठवली जाणार आहेत. तर २०० हून अधिक विद्यार्थ्यांना पीएच. डी. व एम. फिल. पदवी प्रदान केली जाणार आहे.

दीक्षांत समारंभाचे प्रमुख पाहुणे प्रो. डॉ. जी. डी. यादव यांची राधानगरी तालुक्यातील अर्जुनवाड ही जन्मभूमी आहे. त्यांनी १९७४ मध्ये केमिकल इंजिनिअरिंगची पदवी मिळवली. गुणवत्तेच्या जोरावर केमिकल टेक्नॉलॉजीच्या क्षेत्रात संशोधन, नवनिर्मिती करून त्यांनी भारतातच नव्हे तर जगभरात शाहूंच्या नगरीचा नावलौकिक वाढविला. गेल्या चाळीस वर्षांतील योगदानाबद्दल प्रो. डॉ. यादव यांना २५ जानेवारीला पद्मश्री पुरस्कार जाहीर झाला. त्यानंतर कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी मुंबईला जाऊन त्यांचे स्वागत केले. त्याचबरोबर शिवाजी विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभाचे निमंत्रणही दिले आहे, अशी विद्यापीठ वर्तुळात चर्चा आहे.

दीक्षांत समारंभाच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठ प्रशासनाच्या बैठका सुरू आहेत. ग्रंथमहोत्सवाचे आयोजन, पीएच. डी., एम. फीलच्या विद्यार्थ्यांना पदवी कोणाच्या हस्ते प्रदान करावयची याचे नियोजन या बैठकांमध्ये ठरत आहे. राष्ट्पती सुवर्णपदक पदकासाठी सोमवारी विद्यार्थ्यांच्या मुलाखती झाल्या.